| MHGA070007652024 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | ०२.१०.२०२४ |
| नोंदणी तारीख | ०२.१०.२०२४ |
| निकाल तारीख | ०६.०५.२०२६ |
| कालावधी | **०१ वर्ष, ०७ महिने, ०४ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]

| | |
|---|---|
| | **निशाणी – ३०** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **३१/२०२४**<br>पोलीस स्टेशन, एटापल्ली |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६.०५.२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्रमांक ८४/२०२४** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन एटापल्ली,** |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. आर.एस. उंदिरवाडे,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **१. कोमलसिंग जगतसिंग गीरासे,**<br>वय ३१ वर्षे, व्यवसाय – आटाचक्की,<br>राह. इंदिरावार्ड , एटापल्ली, तह.एटापल्ली,<br>जिल्हा गडचिरोली.<br>**२. योगेश त्रंयबक चेंडकाळे,**<br>वय ३७ वर्षे, व्यवसाय – आटाचक्की,<br>राह. आनंदनगर, एटापल्ली, तह.एटापल्ली,<br>जिल्हा गडचिरोली. |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. जैनवार**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २०.०६.२०२४ |
| पहिल्या खबरीची तारीख | २०.०६.२०२४ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०३.१०.२०२४ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १४.०४.२०२५ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २६.०८.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०६.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख, | ०६.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोमलसिंग जगतसिंग गीरासे | .... | ०३.१०.२०२४ | भा. दं. वि. चे कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | – | – |
| २. | योगेश त्र्यंबक चेंडकाळे, | .... | ०३.१०.२०२४ | भा. दं. वि. चे कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | रूपराव नामदेव उगे (**निशाणी १८**) | फिर्यादी |
| सा.क्र. २ | किरणकुमार पोलोसिंग डोंगरे (**निशाणी २२**) | साक्षीदार |
| सा.क्र. ३ | मनोज नारायण अलोने (**निशाणी २४** ) | साक्षीदार |
| सा.क्र. ४ | कालेश सत्यनारायण पुपरेडडीवार (**निशाणी २५**) | तपासी अधिकारी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–१९/सा.क्र.१** | बयाण |
| २. | निशाणी **पी–२०/सा.क्र.१** | प्रथम छापील खबर |
| ३. | निशाणी **पी–२१/सा.क्र.१** | घटनास्थळ पंचनामा |

**ड. <u>महत्त्वाच्या वस्तु</u>:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | आर्टिकल अ व ब | छायाचित्रे |

## न्यायनिर्णय

[आज दिनांक ०६ मे, २०२६ रोजी उद्घोषित]

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४,३२३ व ५०६(ब) प्रमाणे खटला चालवण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दिनांक २०.०६.२०२४ रोजी ते नेहमी प्रमाणे सकाळी १०.०० वा. तालुका कृषी अधिकारी कार्यालय एटापल्ली येथे शासकीय ड्युटी कामी गेले व कार्यालयात कामकाज करीत असतांना दुपारी ०४.०० वा. सुमारास आमचे कार्यालयामधील आरोपी नामे कोमलसिंग जगतसिंग गिरासे कृषी सहाय्यक यांनी खुर्ची उचली व ती खुर्ची कार्यालयातील कुलरच्या समोरील भागाला लागल्याने कुलरचा समोरील भाग तुटला व कुलरचा खडखड आवाज येवु लागला. तेव्हा ते आपल्या टेबल वरून उठून काय झाले हे पाहण्या करीता गेले असता आरोपी क्र.१ कोमलसिंग गिरासे अचानक फिर्यादीला मारण्याकरीता कार्यालयातील खुर्ची उचलुन मारण्यासाठी त्यांच्याजवळ आला. तसेच आरोपी क्र.२ नामे योगेश त्र्यंबक चेंडकाले हा त्याचे जवळ हजर होते व त्या दोघांनी फिर्यादीला आमची आमदार, खासदार यांच्या कडे तक्रार करतो, या साल्या, मादरचोदाला मारा असे म्हणाले व त्यांना आरोपी क्र.२ योगेश चेंडकाले यांनी आपले दोन्ही हातांनी गळा पकडून धक्काबुक्की केली व मान मुरगळली तसेच दोघांनी मला पाहुन घेण्याचे व जिवानिशी मारण्याची धमकी दिली. त्यावेळी त्यांच्या कार्यालयातील नाम किरणकुमार पालुसिंग डोंगरे, यांनी मध्यस्थी पडुन त्यांना सोडविले त्यावेळी कार्यालयात नानाजी तिम्मा व अलोने है कर्मचारी हजर होते. घटनेच्या दिवशी सायंकाळी ०७.३० वा. सुमारास पोस्टे एटापल्ली येथे तक्रार देण्याकरीता गेले असता परंतु त्यांची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचार कामी एटापल्ली येथे नेले.

३. पोलीस ठाणे अंमलदाराने सदर तक्रारीवरुन अपराध क्र.३१/२०२४ उपरोक्त कलमान्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास पो.हवा. कालेश पुप्परेडडीवार यांच्याकडे सोपवण्यात आला. त्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. घटनास्थळावर जावुन पंचनामा पंचांसमक्ष तयार केला. त्यानंतर त्याने फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब

नोंदवले. आरोपीला अटक करुन तसा अटक पंचनामा तयार केला. रुग्णालयातून फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. पुरावा गोळा करुन त्यांनी सविस्तर अहवाल तयार करुन तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.१४.०८.२०२५ रोजी आरोपीविरुध्द नि.क्र.१५ वर दोषरोप निश्चित केले. त्यातील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगितला. त्यांनी गुन्हा कबूल न करता न्याय चौकशी सामोरे जाणे पसंत केले. त्याच्याविरुध्द पुरावा असल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदवण्यात आले.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपींनी समान उददेशाच्या पुरर्सनार्थ फिर्यादी रूपराव नामदेव उगे यांना उद्देशून "साले मादरनोट" असे अश्लील शब्द उच्चारले आणि तुमचे असे उच्चारण अश्लील होते व त्यामुळे इतरांना त्रास झाला आणि याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २९४ सह कलम ३४ अन्वये अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | ...नाही. |
| २. | त्याचप्रमाणे दिनांक, वेळ आणि ठिकाणी,आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी त्यांनी स्वेच्छेने आणि कोणत्याही गंभीर किंवा अचानक चिथावणीशिवाय फिर्यादी रूपराव नामदेव उगे यांना दुखापत पोहोचवली आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ३. | वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, आरोपींनी | |

| | | |
|---|---|---|
| | समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी फिर्यादी रूपराव नामदेव उगे याला जीवे मारण्याची धमकी देऊन, भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

५. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकामी चार साक्षीदारांची साक्ष नोंदवली.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करिताः</u>**

६. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने ते मी एकत्रीतरित्या निर्धारणासाठी घेतले आहे. दि.२०/०६/२०२४ रोजी ते सायंकाळी १६.०० वा. आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली, दुखापत पोहचविल्याचे अभियोगपक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे.

७. फिर्यादी साक्षीदार सा.क्र.१ **रूपराव उगे** यांचे सरतपासात असे कथन केले की, घटना २०.०६.२०२४ रोजी तालुका कृषी अधिकारी, एटापल्ली कार्यालयात घडली. घटना अंदाजे ३.३० वाजताच्या सुमारास घडली. त्यादिवशी ते कार्यालयात काम करीत होते. त्यांना खुर्ची मोडल्याचा आवाज आला. त्यानंतर त्यांनी बाहेर निघून पाहिले त्यावेळेस कुलरचा एक पाता तुटलेला होता व खुर्ची पण मोडलेली होती. ज्यावेळेस ते बाहेर निघाले त्यावेळेस आरोपी क्र.२ चेंडकाले यांनी त्यांना शिवीगाळ केली. त्यांनी त्यांना 'साल्या, मादरचोदा' अशी शिवीगाळ केली होती. तो म्हणाला की, आमदार, खासदारकडे तक्रारी करतो, मी असे आमदार खिश्यामध्ये ठेवतो, असे आरोपी क्र.२ चेंडकाल म्हणाला. त्यानंतर आरोपी क्र.२ चेंडकालेने कॉलर पकडून त्यांचा गळा दाबला. त्यानंतर किरणकुमार डोंगरे यांनी मध्यस्ती करुन भांडण सोडविले. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दिली. त्यांनातोंडी फिर्याद नि.क्र.१९ वर सही असून त्यातील मजकूर खरा

व बरोबर आहे. त्यांना छापील प्रथम खबर नि.क्र.२० वर सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. दोन–तीन दिवसांनी पोलीस आले होते. त्यांनी पोलिसांना घटनास्थळ दाखविले होते. घटनास्थळ आमचे कार्यालय आहे. त्यांना घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२१ व घटनास्थळाचे छायाचित्र आर्टिकल 'अ' व 'ब दाखविण्यात आले.

८. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, त्यांच्या कार्यालयात काही कर्मचा–यांना कार्यालयात काम करावे लागते व काही कर्मचा–यांना फिल्डवर काम करावे लागते. दोन्ही आरोपींचे काम फिल्डवर्क आहे. दि.२१.०६.२०२४ पासून ते २८.०६ .२०२४ पर्यंत सुट्टीवर होते. ते सुट्टीवर एटापल्ली येथेच होते. त्यांचे मुळ गाव हिंगणघाट आहे. त्यांच्या निवासस्थानपासून पोलीस स्टेशन जायला १० मिनिटे लागतात. त्यांनी घटनेची तक्रार २०.०६ २०२४ रोजी संध्याकाळी दिली. त्यांनी हाताने लिहून रिपोर्ट दिली होती.

९. त्यांनी तक्रार दिल्यानंतर दोन–चार दिवसाने पोलीस पंचनाम्याकरिता आले. जेव्हा पोलीस घटनास्थळ पाहण्यासाठी आले तेव्हा ते नव्हते. कोणतेही कागद वाचून खरे वाटले तर सही करतो. त्यांना नि.क्र.१९ दाखविली. त्यामध्ये दिनांक २८.०६.२०२४ नमूद आहे. ते दि. २८.०६. २०२४ रोजी पोलीस स्टेशनला गेले होतो किंवा नाही याबाबत त्यांना सांगता येणार नाही. कन्यका बैंक, शाखा गोडपिपरी येथून त्यांनी कर्ज घेतलेला आहे. कर्ज भरा म्हणून त्यांना नोटीस येत असतात. घटनेचे पाच–सहा महिन्यापूर्वी आरोपी चेंडकाले यांचेकडून २०,०००/– हात उसने घेतले होते. त्यांचे व आरोपीचे संबंध चांगले असल्याने त्यांनी त्यांना फोनपे वरुन पैसे पाठविले होते. इतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

१०. साक्षीदार सा.क्र.२ **किरणकुमार डोंगरे** यांचे सरतपासात असे कथन केले की, घटना २०.०६.२०२४ रोजी तालुका कृषी अधिकारी, एटापल्ली कार्यालयात घडली. घटना अंदाजे ३.३० ते ४.०० वाजताच्या सुमारास घडली होती. आरोपी व फिर्यादीची बोलाबोली चालु होती. त्यानंतर त्यांनी त्यांचे भांडण सोडविले त्यांचे आर्थिक व्यवहाराबाबत बोलाबोली चालु होती. त्यांना त्यांचे आर्थिक व्यवहाराबाबत माहिती नाही. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, ते नोकरीवर असल्याने खोटे बोलत नाही. फिर्यादी त्यांच्या चेंबर मध्ये बसतात, ते व आरोपी

फिल्डवर असतात त्यामुळे ते चेंबरचे बाहेर बसतात. त्यांनी इतर सर्व सुझाव नाकारला.

११. साक्षीदार सा.क्र.३ **मनोज अलोने** हा साक्षीदार असून त्याच्या सरतपासात असे आले आहे की, ते त्यांच्या कार्यालयात काम करतात. त्यांना घटनेबाबत माहिती नाही. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, आरोपीने फिर्यादीला धक्काबुक्की केली व खाली पाडले व जिवे मारण्याची धमकी दिली. उलटतपासातील इतर सर्व सुझाव नाकारला.

१२. साक्षीदार सा.क्र.४ **कालेश पुपरेडडीवार** यांचे सरतपासात असे आले आहे की, दि.२८.०६.२०२४ रोजी ते पोलीस स्टेशन, एटापल्ली येथे कार्यरत होते. त्यांना सदर गुन्हयाचा तपास सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षदाराचे बयान नोदंविले. दिनांक २९.०६.२०२४ ला घटनास्थळ आरोपीच्या कार्यालयात जावुन घटनास्थळ पंचनामा २१ तयार केला. सदर प्रकरणात आरोपींचा सहभाग असल्याचे आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी तपास मिळाल्यानंतर फिर्यादचा अवलोकन केला. दि.२०.०६.२०२४ रोजी फिर्यादी पोलिस स्टेशनला आला होता याबाबत त्यांनी चौकशी केली होती. तसेच दि. २०.०६.२०२४ रोजी फिर्यादी दवाखान्यात गेला होता याबाबत त्यांनी चौकशी केली होती. फिर्यादी दि.२०.०६.२०२४ रोजी पोलिस स्टेशन आला होता आणि तो त्याच दिवशी दवाखान्यात गेला होता हा दाखविण्याकरीता कोणताही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेला नाही. जर तब्येत जास्त खराब असली तर दवाखान्यात जावुन बयान घेता येते. दि.२०.०६ २०२४ पासुन ते दि. २८.०६.२०२४ पर्यंत फिर्यादी कुठे होता याची चौकशी केली नाही. फिर्यादीने सांगितले होते की, तो वैद्यकीय रजेवर होता. सरकारी कर्मचारी वैद्यकीय रजेवर गेले तर तसा अर्ज कार्यालयात करावा लागले. दि.२१.०६.२०२५ पासुन ते दि.२८.०६.२०२४ फिर्यादी वैद्यकीय रजेवर होता याची शहानिशा करण्याकरीता त्याचे कार्यालयात जावुन वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले नाही. इतर सर्व सुझाव नाकारला.

१३. सहा.सरकारी अभियोक्ता आणि आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच प्रकरण व त्यामध्ये दाखल सर्व दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

१४. अभिलेखावरील साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फक्त चार साक्षीदार तपासले. सा.क्र.१ फिर्यादी आहे. त्याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याने आपल्या पुराव्यात असे सांगीतले की, आरोपी क्र.२ चेंडकाले याने शिवीगाळ केली होती आणि गळा दाबला होता. परंतु त्यांनी आरोपी क्र.१ बाबत काही सांगीतले नाही. सा.क्र.२ व ३ हे स्वंतत्र साक्षीदार आहे. परंतु त्यां अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. सा.क्र.४ तपासी अधिकारी आहे व त्याचा पुरावा तांत्रीक बाबीवर अवलंबुन आहे. अभिलेखावर सा.क्र.१ फिर्यादीच्या पुराव्याला दुजारोप करणारा पुरा अभिलेखावर आला नाही. अभियोगाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीने फिर्यादीला हातउसने रक्कम दिली होती व त्याकारणावरून त्यांच्यात वाद झाला होता. परंतु कारण काही असो अभिलेखावर आणण्याची जबाबादारी अभियोगपक्षाची आहे. सा.क्र.१ फिर्यादीची साक्षेला स्वंतत्र साक्षीदारांनी दुजोरा दिला नाही. त्यामुळे फक्त फिर्यादीच्या साक्षेवर विश्वास ठेवून आरोपींना दोषी ठेवणे न्यायोचित ठरणार नाही. पुढे असे आहे की, अभियोग पक्षाच्या कथनानुसार घटना फिार्यदी व आरोपीची कार्यालयामध्ये झाली होती. तेव्हा घटना कार्यालयात घडली होती तेव्हा इतर साक्षीदार हजर होते किंवा नाही याबाबत अभियोग पक्षाने पुरावा अभिलेखावर आणला नाही. इथे हे म्हणने गरजेचे आहे की जेव्हा आरोपी आणि फिर्यादीमध्ये भांडण झाले त्यामुळे कोण कोण हजर होते त्याबाबत फिर्यादीने सांगीतले नाही. त्यामुळे एकटया फिर्यादीवर विश्वास ठेवून आरोपींना दोषी धरणे उचित होणार नाही. एकंदरीत वर चर्चा केल्याप्रमाणे सर्व बाबींचा विचार करता आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला असे माझे मत आहे. परिणामतः पुराव्याअभावी, मी मुददा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ करिता :**

१५. उपरोक्त चर्चेनुसार मुद्दे क्र.१ ते ३ चे कारणमिमांसेवरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द केला नसल्याने, आरोपीला सदर खटल्यातुन निर्दोष मुक्त करणेचे निष्कर्षाप्रत मी आलो आहे. जप्त असलेली लोखंडी सळाख ही मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्याचा आदेश पारित करणे उचित होईल. सदर प्रकरणात

माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता**[1] मध्ये दिलेल्या निर्देशाची अनुपालन करण्याची आवश्यकता आहे. म्हणुन, मुद्दा क्र.४ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.१ **कोमलसिंग जगतसिंग गीरासे** व आरोपी क्र.२ **योगेश त्रंयबक चेंडकाळे,** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.चे कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ नुसार दंडनिय अपराधातुन निर्दोष ठरवून मुक्त करण्यात येते.

२. आरोपींची जुनी जामिनपत्र रद्द करुन जामिनदारास मुक्त करण्यांत येते.

३. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी प्रत्येकी रूपये २५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता**[2] या प्रकरणात दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरुन, या न्यायनिर्णयाची एक सत्यप्रत मा. जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.06 18:33:18 +0530

दि.०६.०५.२०२६ (एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी

1 फौजदार अर्ज क्र.३८०/२०१९ मध्ये दि.१६.०७.२०२० चे आदेशाप्रमाणे

2 फौजदार अर्ज क्र.३८०/२०१९ मध्ये दि.१६.०७.२०२० चे आदेशाप्रमाणे